# आचार्य विनोबा भावे यांचे धर्म चिंतन

**डॉ. वकील टी. शेख,** राज्यशास्त्र विभागप्रमुख, तायवाडे महाविद्यालय, महादुला—कोराडी, जि. नागपूर. (४४१११११) मो. ९४२३१०७३८३

.........................................................................................................

आचार्य विनोबा भावे हे भारतातील थोर विचारवंत आणि कर्मयोगी म्हणून साऱ्या जगाला परिचित आहे. भारतासारख्या कृषीप्रधान देशाला वरदान ठरणाऱ्या एक नाविण्यपूर्ण भूदान चळवळीचे प्रणेते, श्रेष्ठ सर्वोदयी, धर्मवादी असूनही धर्मांधतेचे विरोधक, अस्पृश्यतेचे विरोधक आणि थोर विचारवंताच्या मालिकेतील एक व्यक्तिमत्त्व म्हणून ओळखले जाते.

वेद उपनिषदे, ब्रह्मसूत्र, शांकरभाष्य, श्रीमद्भगवतगीता याबरोबरच 'कुराण शरीफ' आणि संस्कृत व आधुनिक भारतातील भाषांमधील संतवाङ्मयाचे गाढे अभ्यासक, गिताई, गिताप्रवचने, मधुकर आदी ग्रंथामधून आणि साहित्य याविषयीचे सामाजिक आणि धार्मिक तत्त्वज्ञान आचार्य विनोबांनी मांडले. परंतु आजच्या आधुनिक काळात त्यांचे विचार कालबाहय झाल्याचे दिसून येते.

**सर्वधर्मसमभावात मानवधर्माची स्थापना :**

विनोबाच्या मते, कोणत्याही धर्माचा दुसऱ्या धर्माला विरोध नाही. सर्वाचा विरोध जर कोणाला असेल तर तो अर्धमाला आहे. अर्धमाच्या विरुद्ध सर्वानी एक झाले पाहिजे. ते आपआपसात लढतील तर नष्ट होतील.

हिंदु मुस्लिम एकता भारताची फार मोठी समस्या आहे. जी मनुष्य सोडवू शकला नाही तर कालपुरुष सोडवेल. म्हणून अनंतकाळाच्या पार्श्वभूमीवर तिचे फारसे मूल्य नाही. परंतु सर्वधर्म समभावाचे, जो या समस्येचे सूक्ष्मरूप आहे. अनंत काळातही एक विषेश महत्त्व आहे. भारताने समन्वयाचा विचार जगाला दिला. सर्वधर्मसमभाव याचाच परिपाक आहे. तो परिपाक आजही पूर्ण झाला नाही. तो आपल्याला पूर्ण करायचा आहे. [१]

आज आम्हाला मानवप्रेमाचा धर्म स्थापन करणे गरजेचे आहे. त्यात पूजा अर्चा राहणार नसून मानवसेवा येईल. भक्तीचे सेवेमध्ये रुपांतर करणाऱ्या मानव सेवा धर्माची स्थापना करणे काळाची गरज आहे. प्रेम हा असा महान धर्म आहे की ज्यात सगळे धर्म बुडून जातात. जेथे सूर्याचा प्रकाश असतो तेथे सगळे तारे नाहीसे होतात. त्याचप्रमाणे प्रेमधर्माच्या प्रकाशासमोर दुसरे सगळे धर्म क्षीण होवून जातात. आज त्याच प्रेमधर्माची स्थापना करावयाची आहे. आज हिंदुधर्माचे नाव सांगणारे जसे कोटयावधी लोक आहेत. त्याचमाणे इस्लाम धर्माचेही लोक आहे. हिंदु किंवा इस्लाम धर्माचे कोणीच नाहीत. आपण भाषा अद्वैताची बोलतो, पण व्यवहारात आपली मने वेगवेगळी ठेवतो. या प्रकारचे विचार व आचार यातील अंतर याला मनातून बाहेर काढून टाकणे आवश्यक आहे.

आपल्या या भारतभूमीमध्ये अगदी प्राचीन वेदकाळापासून आजपर्यंत 'धर्म' हा शब्द सतत चालत आला आहे. या शब्दाला दुसऱ्या कोणत्याही भाषेत नेमका प्रतिशब्द मिळत नाही. धर्म हा एक व्यापक शब्द आहे. आपले जीवन ज्या निति—विचारावर आधारलेले असते, त्याला आपण धर्म म्हणतो. धर्म अविचल आहे. त्यांची तत्त्वे पक्की असतात. ज्याप्रमाणे गाणिताची तत्त्वे कुठल्याही देशात आणि कुठल्याही काळात स्थिर असतात. त्याचप्रमाणे धर्माच्या तत्त्वांतही कधी बदल होत नाही. धर्माची तत्त्वे मूलभूत असतात. तिन्ही काळात आणि सगळया देशांत ती सारखची आणि अविचल असतात. उदा. सत्य, प्रेम, करुणा हे सद्‌गुण देशकालानुसार बदलत नाहीत. भगवंतानी या गुणांना दैवी संपत्ती म्हटले आहे. वस्तुतः जो अविचल, ध्रुव, शाश्वत स्थिर आणि नित्य आहे. तोच सनातन धर्म आहे. आम्ही हे प्राचीन काळापासून मानत आलो आहोत आणि आजही मानतो आहे.

आम्हाला धर्माला फक्त मंदिर—मठाच्या हद्‌दीपर्यंतच मर्यादित ठेवायचे नाही किंवा स्थितप्रज्ञाच्या सुपुर्दही करायचे नाही. उलट त्याला समाजाच्या रोजच्या व्यवहारात आणायचे आहे. जसे आम्हाला जमिनीचे वाटप करायचे आहे, संपत्तीचे वितरण करायचे आहे. तसेच धर्माचेही समाजव्यापी वितरण करायचे आहे. आज आम्ही ज्यांना धर्म म्हणतो ते वास्तविक धर्म नाहीत. त्या श्रद्धा आहेत. आपण ज्याला धर्म म्हणतो. त्याची स्थापना अजून व्हावयाची आहे. सर्व धर्मानी काही ना काही श्रद्धा निर्माण केल्या आहेत. त्यामूळे लोकांच्या मनावर धर्माचा काही ना काही प्रभावही आहे. परंतु आज ज्यांना आम्ही धर्म म्हणतो त्या धर्माची स्थापना झाल्यानंतरही त्यांना अजून धर्माचे स्वरुप प्राप्त झालेले नाही. तर हे सगळे धर्म नसून पंथ आहे.

आजपर्यंत खरा धर्म बनला नाही. याचे कारण धर्म मानसिक भूमिकेवर राहिला. आता धर्म विज्ञानाच्या भूमिकेवर येईल तेव्हा खरा धर्म बनेल. विज्ञानामुळे जगाचे स्वरुप स्वच्छ करेल. धर्माच्या नावाने चालणारे अधर्म आता विज्ञानयुगात टिकणार नाही. बुद्धीच्या कसोटीवर कसला जाणारा, मानसिक कल्पना — कामना इत्यादींच्या वर गेलेला व जगातले सगळे भेदभाव उपासनेसकट काढून टाकणारा, धर्मच यापूढे टिकणार आहे. आजपर्यंत जे झाले ते धर्माच्या दिशेने टाकलेले पाऊल होते. आता आम्हाला विज्ञान आणि आत्मज्ञान या दोन पखांच्या सहाय्याने उडून धर्माची स्थापना करणे आवश्यक आहे. याची सर्व मानवजातीने दखल घेतली पाहिजे. [२]

**धर्म आणि व्यवहार :—**

ज्याप्रमाणे डोळे, कान इत्यादी इंद्रियाद्वारे मनच निरनिराळयारीतीने प्रकट होत असते. त्याप्रमाणे राजकारण, समाजव्यवस्था, आर्थिक प्रवृत्ती इत्यादी विषयांच्या रूपाने मनुष्याचा धर्म दिसून येतो. हिंदुस्थानची विशिष्ट मनोरचना लक्षात घेता जे राजकारण धर्माच्या पायावर उभारलेले नसेल ते उन्मत्त होईलच, पण यशस्वीही होणार नाही. धर्मवृत्ती हा भारतीय मनाचा विशेष आहे. हे भारतीय मन कमीत कमी दहा हजार वर्षांच्या पूर्वेतिहासाचे बनलेले असल्यामुळे यात फरक करणे शक्य नाही व इष्टही नाही. भारतीय संस्कृतीने धर्माच्या साम्राज्याखाली व्यवहाराला स्वराज्य दिलेले नाही. ही धार्मिक मनोवृत्ती वेदोपनिषदांच्या काळापासून कमी—अधिक प्रमाणात आजपर्यंत हिंदुस्थानात सर्वत्र नांदत आहे. नानक, कबीर, चैतन्य, तुलसीदास, रामदास इत्यादी सर्व प्रांतातील संतमंडळीनीही याच धर्मवृत्तीचा परिपोष करण्यात आपले सर्व बळ खर्च केले आहे. या ऐतिहासिक परंपरेचे उल्लंघन करणारे राजकारण यशस्वी होणे शक्य नाही. असहकारीतेच्या चळवळीने जे अद्‌भुत कार्य केले त्याची अनेक कारणे आहेत. काल—माहात्म्य किंवा व्यक्तिमाहात्म्य ही कारणेही नाकारता येणार नाहीत. पण या सर्व कारणांपेक्षा चळवळीत दाखल झालेले धर्माचे तेज मुख्य कारण आहे. यात शंका नाही. वस्तुतः 'धर्माचे तेज' या शब्दात दोष आहे. तेज किंवा बळ धर्मामध्येच असते. इतर कशात असणे शक्य नाही. म्हणून 'धर्माचे तेज' याचा अर्थ 'धर्म हेच तेज' असा आहे. अशी स्थिती हिंदुस्थानातच आहे, असे नाही. सर्व जगाला हा सिद्धांत लागू आहे. [३]

धर्म आणि अर्थ हे बरोबर चालत असतात, हा आमच्या अनेक वर्षापासून चालत आलेल्या सभ्यतेचा संदेश आहे. जो धर्म संपूर्ण अर्थाचे नियमन करु शकत नाही. तो खरा धर्म होऊ शकत नाही. त्याचप्रमाणे जो अर्थ धर्मबुद्धीला टिकवून ठेवू शकत नाही, किंवा तिच्यावर आघात करतो, तो खरा अर्थ नाही. म्हणून धर्म आणि अर्थ, यांच्यात विरोध असू शकत नाही.

**धर्मप्रचाराकांची तीन कार्ये —**

ज्यांना धार्मिक जीवन जगायचे आहे. त्यांनी कमीत कमी तीन कामे तर करायलाच हवीत.

पहिले आहे विचार—संशोधनाचे (विचार — शुद्धीचे) कार्य. प्राचीन ग्रंथात काही अंश चांगलाही असतो आणि काही चुकीचाही असतो. असा चांगला — वाईट दोन्ही प्रकारचा अंश एकत्र करून लोकांसमोर ठेवणे, हे धर्मकार्य मानले जाऊ नये. सार काय आहे आणि असार काय आहे, याची परीक्षा करता आली पाहीजे, पारख असली पाहिजे. आपण गव्हाला दळल्यावर चाळणीत चाळतो आणि सारभूत पीठ उचलून घेतो — तसे जुन्या ग्रंथातून चांगले विचार घेतले पाहिजेत आणि चुकीचे विचार सोडून दिले पाहिजेत. जो असार विचार सोडून देण्याची हिंमत करू शकत नाही तो धर्मकार्यात अपूर्णच सिद्ध होईल, तो धर्माला पुढे नेऊ शकणार नाही.

धार्मिक पुरूषांचे दुसरे काम लोकजीवनात प्रवेश करणे आणि करूणेची स्थापना करणे, हे आहे. देवाच्या मूर्तीची स्थापना केली, पूजा केली एवढयाने कर्तव्य पुरे होत नाही. एवढयाने जीवन सुधरत नाही. ते तर एक प्रतीक आहे. जेव्हा आम्ही परमेश्वराजवळ दयेसाठी, करूणेसाठी प्रार्थना करतो तेव्हा आमच्यावर पण दुसऱ्यावर दया करण्याची जबाबदारी येते की नाही? म्हणून धार्मिक लोकांना लोक—जीवनात करूणेची स्थापना करण्याचे कार्य पुर्ण करावे लागेल. त्याकरिता लोकांच्या जीवनात काय समस्या आहे यावर विचार करून ती हातात घ्यावी लागेल. समस्या धार्मिक पद्धतीने सोडविल्या जाऊ शकतात, हे करून दाखवावे लागेल. उदाहरणार्थ, समाजात होणाऱ्या चोऱ्या. यावर काय उपाय होऊ शकतो, हे धार्मिक पुरूषांना शोधावे लागेल. पण ते म्हणतात की जे तर सरकारचे काम आहे. म्हणजे तुमची काहीच जबाबदारी नाही काय? समाजात चोऱ्या कां होतात हयाचा शोध घेतला म्हणजे उपाय सुचेल. पण आज तर या धर्मस्थानांमध्येच धन—संग्रह होत असतो आणि त्यांनाच कुलुपे घालावी लागतात.

धर्म—प्रचारकांचे तिसरे काम, निरंतर आपल्या वाणीची, शरीराची आणि चित्ताची शुद्धी करणे हे आहे. त्यांनी नित्य आत्मशुद्धीसाठी उपासना, तपस्या केली पाहिजे. [४]

**खऱ्या धर्माची आवश्यकता :—**

आज जगात दोन प्रकारच्या संस्था फार शक्तिशाली झाल्या आहेत. एक आहे धर्मसंस्था आणि दुसरी आहे शासनसंस्था. मूळात या दोन्ही संस्था लोकसेवेच्या हेतूने उभ्या केल्या गेल्या. दोन्हीची गरज भासली आणि म्हणून त्यांची निर्मिती झाली. परंतु आज याच दोन्ही संस्था समाजासाठी समस्या बनल्या आहेत. विनोबांच्या मते, समाजाला धर्मापासून वेगळे करणे योग्य नाही, धर्म हा असायलाच हवा. पण या धर्मसंस्था आता नकोत. धर्मसंस्था कुठल्याही उद्देशाने निर्माण झालेली असो, आज जर ती चालू राहिली तर त्याने समाजाला लाभ होण्याऐवजी नुकसानच जास्त होईल, असे विनोबांना खात्रीपूर्वक वाटते, आणि हा त्यांचा विश्वास अधिकाधिक दृढ होत गेलेला होता.

आज जगाची काय स्थिती आहे? ख्रिश्चन, इस्लाम, हिंदु आणि बौद्ध हे जगातले चार प्रमुख धर्म आहेत आणि या व्यतिरिक्त आणखीही लहानमोठे धर्म आहेतच. या सगळया धर्मवाल्यांनी आपापल्या संस्था बनविल्या आहेत. युरोपात पोप काम करतो आणि चर्चची फार मजबूत रचना केलेली आहे. जसे प्रत्येक जिल्हयाचा एक अधिकारी असतो. तसेच तिकडे प्रत्येक जिल्हयात चर्चचा एक अधिकारी असतो. अशाच प्रकारची रचना इस्लाम धर्मात पण आहे. जागोजागी त्यांच्या मशिदी असतात आणि तेथे मुल्ला राहतात. त्यांच्यातर्फे काही धर्मप्रचाराचे काम होते आणि उत्सव वगैरे साजरे केले जातात. हिंदूमध्येही मंदिर, मठ वगैरे आहेत आणि त्यांच्याद्वारे अशीच कामे होत असतात. बौद्धांचेही असेच चालते.

हे सगळेच धर्म अहिंसा, शांती, प्रेम वगैरे तत्त्वांना मानणारे आहेत. पण तरीही जगात शांती स्थापना करण्याच्या उद्देशाने या कोणाचाही म्हणण्याइतका प्रभाव दिसून येत नाही. जेव्हा एक ख्रिश्चन राष्ट्र दुसऱ्या ख्रिश्चन राष्ट्रावर आक्रमण करतो तेव्हा असे आक्रमण करणे बरोबर आहे की नाही, या विषयी पोपला कोणीही विचारत नाही. पोपचे अधिकार क्षेत्र वेगळे आणि आमचे वेगळे, असे मानूनच चालतात. आपल्या व्यवहारावर धर्माचा प्रभाव असावा, हे कोणाला मान्य नाही. समाजाच्या व्यवहारावर या धर्मसंस्थांचा विशेष प्रभाव आहे, असे दिसत नाही. इतकेच नव्हे तर आज त्यांचा जो प्रभाव पडतो आहे, तो वाईटच पडतो आहे आणि हाच आज चिंतेचा विषय झालेला आहे.

विशेषतः श्रद्धाळू लोकांवर धर्मसंस्थांचा फार वाईट परिणाम होतांना दिसतो. धर्माचे जे काही काम आहे त्याची सगळी जबाबदारी या धर्मसंस्थांच्या पुरोहितांवर आहे, असेच या लोकांनी मानले आहे. पुरोहितांना याकरिताच नियुक्त केले आहे, असे हे लोक मानतात एखादे सुंदर देऊळ बांधून दिले, देवळाकरीता जमीन दिली, पैसा दिला की आमचे धर्मकार्य संपले. धर्माकरीता प्रत्येकाला स्वतःला काही करावे लागते. हा विचारच श्रद्धाळू लोकांनी सोडून दिला आहे. जे श्रद्धाळू नाहीत ते पुरोहितालाही विचारीत नाहीत, आणि धर्मालाही विचारीत नाहीत, ते कोणालाच विचारीत नाहीत.

धर्मसंस्था आम्ही या लोकांच्या ताब्यात दिल्या आणि धर्माला या संस्थांच्या तुरुंगात ठेवले. मंदिरात, मशिदीत किंवा चर्चमध्ये गेल्यावर धर्माचे आचरण करायचे. बाजारात गेल्यावर किंवा रोजच्या व्यवहारात धर्माची गरज नाही. तेथे जे खरे खोटे चालते, अधर्म चालतो तो तसाच चालत राहो. तेथे धर्माची लूडबूड चालणार नाही, असे आहे. परंतु धर्माला बाजारात नेले नाही, धर्माला बाजारात येऊच दिले नाही, म्हणून बाजरातला अधर्म मंदिरात येऊन पोहचला. बाजारच मंदिरात शिरला. व्हायला पाहिजे होते उलट—धर्माला बाजारात जायला हवे होते. पण धर्म जाऊ शकला नाही आणि तो मंदिरातूनही अदृश्य झाला. बाजारात अधर्म उघड चालतो, तर मंदिरात लपून छपून चालतो, अशी स्थिती आज आहे.

म्हणून आता धर्माला या धर्मसंस्थातून, पाद्री — पुरोहित — मुल्लांच्या हातांतून, मंदिर — मशीद—चर्चच्या चार भिंतीच्या कैदेतून सोडवायचे आहे आणि खरी धर्म—भावना सर्वत्र पसरविणे गरजेचे आहे. [५]

**धर्माचे चार चरण :—**

**श्रद्धा, सत्य, प्रेम आणि त्याग —**

१) **श्रद्धा** — श्रद्धा लोकांमध्ये आज देखील आहे. बाकी तीन जवळ जवळ संपले आहेत. बिचारा धर्म त्या एकाच पायावर अडखळत, धडपडत चालत आहे. अशाच धर्मकार्यात प्रगती होऊ शकणार नाही. केवळ श्रद्धेच्या आधारावर माणूस उभा राहू शकेल. चालू शकणार नाही. पळू शकणार नाही.

म्हणून धर्माच्या या बाकी तीन चरणांना पण जागे केले पाहिजे. म्हणजे त्यांना पण चालना दिली पाहिजे.

२) **सत्य** – समाज सत्याशिवायही टिकू शकतो. हे मानणे चुकीचे आहे. ते शक्यच नाही. आज लोकांनी असत्याला सत्य मानले आहे. संपत्ती आणि जमिनीवरील मालकीला धर्म मानले आहे. पण कोणी एक व्यक्ती जमिनीची किंवा संपत्तीची मालक होऊ शकते, हे असत्य आहे. संपत्ती आणि जमीन ईश्वराची आहे. ईश्वराचा प्रतिनिधिरुप समाज आहे. आम्ही देवळात जातो आणि देवळातल्या देवाला नैवेद्य देतो. उपाशी देवाची चिंता मात्र करत नाही आणि ज्या देवाला (मूर्तीला) भूक लागत नाही अशा देवाची चिंता करतो. हे ढोंग आहे, असत्य आहे. आम्हाला सत्याची स्थापना करायची आहे.

३) **प्रेम —** याला दया पण म्हणतात. काही वेळा आम्ही दया करतो. परंतु याला आम्ही नित्य धर्म बनविले नाही. घरात प्रेम असते. बाजारात गेल्यावर ते संपते. तेथे एक दुसऱ्याला फसवणे सुरु होते. वास्तविक ज्या प्रेमाचा अनुभव कुटुंबात येतो त्या प्रेमाचा अनुभव सगळया समाजात आला पाहिजे. दरिद्रनारायणाला आपण घरात घेतले पाहिजे आणि घरात आमच्यासारखा त्याचा पण वाटा आहे, असे मानून त्याचा हिस्सा त्याला दिला पाहिजे. (अर्थात समाजाला दिला पाहिजे) सगळयांवर प्रेम करणे हा आमचा धर्म आहे.

४) **त्याग —** समाज त्यागाशिवाय पुढे जाऊ शकत नाही. त्यागाची सवय असेल तर लक्ष्मीप्राप्त होईल. (लक्ष्मी म्हणजे धान्य—फळ—भाजी—दूधाची समृद्धी) शेतकऱ्याला लक्ष्मीची प्राप्ती केव्हा होते? जेव्हा जो उत्तमातले उत्तम बी पेरतो तेव्हा. जर तो त्या बिजांना आपल्या जवळच ठेवेल आणि त्यांचा त्याग करणार नाही, तर पीक येणार नाही. नुसते गवत उगवेल. देव एका दाण्याच्या बदल्यात अगणित दाणे देत असतो. पण एक दाणा तर पेरावाच लागेल. लक्ष्मी, ऐश्वर्य, शोभा, वैभव हे सगळे त्यागामुळेच प्राप्त होत असते. ईशावास्य उपनिषदाने दोन शब्दांत अद्भुत उपदेश दिला आहे. 'त्यक्तेन भुंजीथा:' त्याग करा म्हणजे भोग मिळेल. [६]

जोपर्यंत मानव समाजात यांचा (चार चरणांचा) अंर्तभाव होणार नाही तोपर्यंत सत्य, अहिंसा, वगैरे श्रद्धा श्रद्धाच राहतील, तो धर्म बनणार नाहीत.

**खऱ्या धर्माची स्थापना :—** आजपर्यंत खरा धर्म बनला नाही याचे कारण असे की तो मानसिक भूमिकेवर राहिला. आता तो जेव्हा विज्ञानाच्या भूमिकेवर येईल तेव्हा खरा धर्म बनेल. विज्ञानामुळे जगाचे स्वरुप स्वच्छ कळेल. हे असले जुनाट धर्म आणि धर्माच्या नावाने चालणारे अधर्म आता विज्ञान युगात टिकणार नाहीत. बुद्धीच्या कसोटीवर कसला जाणारा, मानसिक कल्पना—कामना इत्यादींच्या वर गेलेला व जगातले सगळे भेदभाव—उपासनेसह सगळे भेदभाव काढून टाकणारा धर्मच यापुढे टिकेल.

हिंदुस्थानात मुख्य अडचण धर्माचीच आहे. येथे अनेक धर्म आहेत आणि अनेक जाती निर्माण झाल्या आहेत. खेडयात लोकांसमोर गावातले सगळया जातीचे, सगळया धर्माचे लोक एकत्र कसे येतील, हाच मोठा प्रश्न उभा असतो. वास्तविक ज्या धर्माची स्थापना ऐक्य निर्माण करण्याकरिता झाली. त्या धर्मानीच भेदभाव निर्माण केले आहेत ही फार दुर्दैवाची गोष्ट आहे.

चारशे वर्षापुर्वी हैद्राबाद संस्थानात निपट निरंजन नावाचा एक साधु पुरुष होऊन गेला. त्याने गावात एक देऊळ बांधले. देवळात हिंदू येऊ लागले. पण मुसलमान येत नव्हते. त्याने विचार केला ही तर एकांगी सेवा होते आहे, पूर्ण मानवतेची सेवा होत नाही. मुसलमानी राज्य आहे तेव्हा कदाचित मशीद बाधली तर तेथे सर्व लोक येतील. म्हणून त्याने देऊळ पाडले आणि त्या जागी एक मशीद उभी केली. मुसलमान लोक खुश झाले आणि मशिदीत येऊ लागले. पण हिंदूंनी येणे बंद केले. तेव्हा साधूने विचार केला की मशीद बांधली तर हिंदू येत नाहीत, देऊळ बांधले तर मुसलमान येत नाहीत आणि मला तर सगळया दुनियेची सेवा करायची आहे. म्हणून त्याने मशीद पाडली आणि तेथे एक शौचकूप बांधला. तेव्हा हिंदू, मुसलमान दोघेही तेथे येऊ लागले. साधू म्हणाला, मी हे एक मानवतेच्या सेवेचे काम करतो आहे, असे मी मानतो.

धार्मिक ऐक्य वाढविण्याचे प्रयत्न लोक अशाप्रकारे करीत असतात. वास्तविक निरनिराळया धर्माचे लोक जगातला द्वेष मिटवीत आहेत. प्रेम वाढवीत आहेत, सहयोगाची भावना विकसित करीत आहेत, असे व्हायला पाहिजे, असे करण्याऐवजी व्यक्ती स्वत:तेच हित या सगळयात घालवीत आहेत, व्यक्ती व्यक्तीला तोडत आहेत. जातिभेद काही ईश्वराने निर्माण केले नाहीत. ईश्वराने मानव निर्माण केला. म्हणून मानवतेकरीता मिळूनमिसळून राहणे हाच धर्म आहे. सगळयांनी आपले हृदय एक करायला हवे. मानवतेला पुढे जाऊ देणे आणि मानवांमध्ये फूट पडू न देणे, हाच खरा धर्म आहे. [७]

**धर्मांतराची चुकीची पद्धत :—**

विनोबांच्या मते, आज जी धर्मांतराची पद्धत आहे म्हणजे ज्या तऱ्हेने धर्मांतर केले जाते, ती पद्धत फार चुकीची आहे. कारण त्यात केवळ संख्या वृद्धीचा विचार आहे. अशातऱ्हेने झालेल्या संख्या वृद्धीमुळे कुठल्याही धर्माच्या प्रमुख संस्थापकाला कधीही आनंद होणार नाही. आपले राज्य धर्मनिरपेक्ष म्हटले जाते. येथे आपल्या धर्माचा प्रचार करण्याचे स्वातंत्र्य संगळयांना आहे. परंतु मतपरिवर्तनाचाद्वारे, हृदय परिवर्तनाचाद्वारे जे परिवर्तन होते, त्या व्यतिरिक्त बाकी जी धर्मांतराची पद्धत येथे चालते ती बंदच करायला पाहिजे. ही पद्धत कायद्याने पण बंद केली जाऊ शकते. असे केल्याने धर्मनिरपेक्षतेमध्ये बाधा निर्माण होणार नाही. मूल जन्मल्याबरोबर त्याचा धर्म ठरत नाही. प्रत्येक माणसाने तो अठरा वर्षाचा झाल्यानंतर आपण कुठल्या धर्माचे आहोत हे घोषित करावे. तो अमुक आईबापांच्या पोटी जन्माला आला म्हणून तो त्या धर्माचा झाला. ही जी परंपरा चालते ती बंद झाली पाहिजे आणि प्रत्येकाने अठरा वर्षाचे वय झाल्यावर आपला धर्म स्पष्ट शब्दात जाहीर केला पाहिजे. मग आईबाप कुठल्याही धर्माचे का असेनात! संतती वाढली तर धर्म वाढेल, असे म्हणणे विचित्रच आहे. सगळे धर्म संयमाला मानतात. तेव्हा संयमाला विरोध करणारा आदेश द्यायचा (संतती वाढवायचे समर्थन करायचे) आणि त्याला धर्म प्रचाराचे साधन मानायचे, हा अगदी चुकीचा विचार आहे. आज सगळया धर्माची फार वाईट स्थिती आहे. पण आम्हाला तर धर्माच्या मूलभूत विचाराचे ग्रहण करायला हवे. यासाठी एक मंत्रच देऊन ठेवला आहे. तो हा की सगळे धर्मपंथ आज कालबाहय आहेत, धर्मपंथ सोडून अध्यात्माकडे वळणे गरजेचे झाले आहे. [८]

हिंदुस्थानात मुख्य अडचण धर्माचीच आहे. येथे अनेक धर्म आहेत आणि अनेक जाती निर्माण झाल्या आहेत. जातीतून संप्रदाय निर्माण झाले आहे. संप्रदाय म्हणजे पांथिक धर्म जे आज रुढ आहेत. एक काळ असा होता की या संप्रदायानी लोकांना एकत्र आणण्याचे कार्य केले. मानसा मानसात विखूरलेल्या समाजाला एकसंघ बनविण्यात या संप्रदायानी एकेकाळी मदत केली. परंतु आज जेव्हा आम्ही संपुर्ण जगाला एक करण्याच्या गोष्टी करत आहोत. तेव्हा हे सगळे संप्रदाय तोडणारे सिध्द होत आहे. हिंदुनी मुसलमानांच्या, ख्रिश्चनांच्या, बौद्धांच्या भावना समजून घ्याव्या. मूसलमानांनी हिंदुच्या व ख्रिश्चनांच्या, बौद्धांच्या भावना समजून घ्याव्या तसेच ख्रिश्चन व बौद्धांनी हिंदू व मुसलमानाच्या भावना समजून घ्याव्या व सत्य, अहिंसा व शांतीच्या मार्गाने प्रेमधर्म स्थापन करुन सर्वत्र बंधूत्व निर्माण करणे आज काळाची गरज आहे. अन्यथा धर्मांधाच्या भावनेतून जगाचा नाश होईल. मानव जात संपुष्टात येईल. हे विनोबांचे विचार आत्मसात करणे समाजाची व काळाची गरज आहे.

**संदर्भग्रंथ सूची**


१. विनोबा, सर्वधर्म प्रभूचे पाय, परंधाम प्रकाशन, पवनार, पहिली आवृत्ती, २००३, पृष्ठ क्र. ८३—८४.

२. विनोबा, सर्वधर्म प्रभूचे पाय, परंधाम प्रकाशन, पवनार (प्रथमावृत्ती), २००३, पृष्ठ क्र. ८६ ते ९५.

३. विनोबा, धर्मामृत, परंधाम प्रकाशन, पवनार, २०००, पृष्ठ क्र. ३ ते ७.

४. विनोबा, धर्म—विचार, संस्कार परिवार, सर्वोदय आश्रम, नागपूर, पृष्ठ क्र. १५ ते १६.

५. विनोबा, धर्मामृत, परंधाम प्रकाशन, पवनार, २०००, पृष्ठ क्र. १२ ते १३.

६. विनोबा, सभी धर्म प्रभूके चरण, सर्वसेवासंघ प्रकाशन, राजघाट (वाराणसी), जनवरी २०१३, पृष्ठ क्र. ९३ ते ९५.

७. विनोबा, धर्मामृत, परंधाम प्रकाशन, पवनार, २०००, पृष्ठ क्र. १५ ते १६.

८. विनोबा, सभी धर्म प्रभूके चरण, सर्वसेवासंघ प्रकाशन, राजघाट (वाराणसी), जनवरी २०१३, पृष्ठ क्र. ८१ ते ८२.